पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७६ /२०१५
दिनांक : ३०/०१/२०१५

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०४/०२/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०४/०२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १२**

दिनांक : **०४/०२/२०१५** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०४/०२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** मौजे पिंपळे गुरव गावाचे विकास योजनेनुसार स.नं.५१ पैकी व ५२ पैकी जागेत आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोगाचे आरक्षण प्रस्तावित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ४००४.७५ चौ.मी. आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव पाठविणेत आलेला असून संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे. सदर आरक्षणाचे जागेपैकी सद्यस्थितीत टी.डी.आर.च्या माध्यमातून सुमारे ३५३९.५२ चौ.मी.जागेचा ताबा महानगरपालिकेकडे आहे. सदर जागेत नाटयगृह बांधणेचे नियोजन आहे. सदर बाबत संबंधित जागा मालक यांचे मालकीचे क्षेत्र वगळून उर्वरित ३५ गुंठे जागेत नाटयगृहाचे काम करता येईल असे सह शहर अभियंता, स्थापत्य, ड प्रभाग यांनी त्यांचे दि.२३/०९/२०१४ चे पत्रानुसार कळविले आहे. तरी एकूण आरक्षणाचे क्षेत्र ४००४.७५ पैकी महानगरपालिकेचे ताब्यात असलेले ३५३९.५२ चौ.मी.क्षेत्र सोडून बांधकामे असलेले उर्वरित सुमारे ४६५.२३ चौ.मी.क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे. तरी बाधीत मिळकतधारक व स्थापत्य ड प्रभाग यांचे मागणीनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ पैकी व ५२ पैकी मधील आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोग पैकी जागेतील सुमारे ४६५.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सूचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७६ /२०१५
दिनांक : ३०/०१/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.